# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:25.08.2025** **वार:सोमवार**

---

1. संसद आणि विधिमंडळामध्ये विवेकी वर्तन असावं; साधक-बाधक चर्चा व्हावी-केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं मत
2. गगनयान मोहीम, आत्मनिर्भर भारताच्या प्रवासातील नवा अध्याय असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचं प्रतिपादन
3. राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील 10 गावं स्मार्ट, इंटेलिजंट करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा आणि
4. जागतिक युवा तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींची अभिमानास्पद कामगिरी

**अमित शहा**

देशाची संसद आणि विधानसभांमध्ये विवेकी वर्तन, साधक-बाधक चर्चा आणि नियमांचं पालन झालं, तरच लोकशाही बहरते, असं मत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केलं. नवी दिल्लीत काल अखिल भारतीय विधिमंडळ पीठासीन अधिकाऱ्यांच्या दोन दिवसांच्या परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. देशाच्या केंद्रीय कायदे मंडळाचे पहिले अध्यक्ष म्हणून विठ्ठलभाई पटेल यांनी पदभार स्वीकारल्याच्या घटनेला 100 वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं ही परिषद दिल्ली विधानसभेत आयोजित करण्यात आली आहे. लोकप्रतिनिधी जेव्हा व्यक्तिगत किंवा पक्षीय हितांपेक्षा 'राष्ट्र सर्वोपरी' हे मूल्य जोपासातील तेव्हाच लोकशाहीची प्रतिष्ठा राखली जाईल. विधिमंडळं ही जनतेचा आवाज पोहोचवण्याचं माध्यम बनायला हवीत, असं शहा म्हणाले.

**गगनयात्री-राजनाथसिंह, चाचणी**

भारत आपल्या पहिल्या मानवी अंतराळ उड्डाण मोहीम, गगनयान साठी पूर्णपणे तयार असून हा आत्मनिर्भर भारताच्या प्रवासातील नवीन अध्याय आहे, असा विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल नवी दिल्लीत व्यक्त केला. गगनयात्री कॅप्टन शुभांशु शुक्ला, प्रसंत बालकृष्णन नायर, अजित कृष्णन, आणि अंगद प्रताप यांच्या विशेष सन्मान समारंभात सिंह बोलत होते. भारत अंतराळाला केवळ संशोधनाचं क्षेत्र म्हणून पाहत नाही, तर ते अर्थव्यवस्था, सुरक्षा, ऊर्जा, आणि मानवतेचं भविष्यातलं द्वार आहे, असं सिंह म्हणाले.

भारतीय अंतराळ संशोधन संघटना अर्थात इस्रोनं गगनयान मोहिमेअंतर्गत अंतराळ केंद्रातून अंतराळवीरांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी पॅराशूट आधारित एअर ड्रॉप चाचणी यशस्वीरित्या पूर्ण केली. इस्रो बरोबर भारतीय हवाई दल, नौदल तसंच संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओ या चाचणीमध्ये सहभागी झाले होते.

**स्मार्टगाव-नागपूर**

आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून शेती, आरोग्य, शिक्षण आदी महत्वाच्या सुविधा उपलब्ध करून देत समृद्ध गावाचं 'रोल मॉडेल' म्हणून उभं राहिलेलं सातनवरी हे गाव एक क्रांतिकारी पाऊल असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल केलं. प्रायोगिक तत्वावर उभारण्यात आलेल्या सर्व आधुनिक सुविधा असलेल्या या गावाच्या शुभारंभप्रसंगी फडणवीस बोलत होते. राज्याच्या प्रत्येक तालुक्यातील 10 गावं 'स्मार्ट' आणि 'इंटेलिजेंट' करण्याच्या या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात जवळपास साडे तीन हजार गावांचा समावेश असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. केंद्रीय दूरसंचार मंत्रालया अंतर्गत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसनं अन्य 24 कंपन्या तसंच राज्य शासन आणि नागपूर जिल्हा प्रशासन यांच्या सहकार्यानं हे गांव साकार केलं आहे.

**द्राक्ष**

कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचं नवीन पर्व सुरू झालं असून शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा वापर करावा आणि विषमुक्त सेंद्रिय शेतीकडे वळावं असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात केलं. राज्य द्राक्ष बागायतदार संघाच्या 65 व्या वार्षिक

अधिवेशनात ते बोलत होते. द्राक्ष उत्पादकांमुळे राज्यात खऱ्या अर्थानं समृद्धी आली आहे; मात्र आव्हानांचा सामना करतांना बागायतदारांनी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घ्यावी, असं पवार म्हणाले......

**नेहमी राज्यकर्ते जरी कुणी असले, तरी शेतकरी समाजाला समाधानी करण्याच्या करता अनेक प्रकारच्या योजना केंद्र सरकार, राज्य सरकार घेत असतं. परंतु त्याच्यातन आता स्पर्धेच युग आलेलं आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स च युग आलेलं आहे. ज्याला AI शॉर्ट फॉर्म नावाने आपण ओळखतो. ही देखील आज काळाची गरज बनलेली आहे. त्याचाही वापर तुम्ही आपण सगळ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये सुरु केला.**

द्राक्ष बागायतदार संघाच्या विविध मागण्या पूर्ण करण्यासाठी शासन सकारात्मक असून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहे, अशी ग्वाही पवार यांनी यावेळी दिली. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून सरकार काम करत असल्याचं भरणे यावेळी म्हणाले. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी राज्य सरकार विविध योजना आणणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>स्मारक-लोकार्पण-जळगाव</u>**

जळगाव जिल्ह्यातल्या चाळीसगाव इथं महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले स्मारकाचं लोकार्पण काल अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आलं. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यावेळी उपस्थित होते. केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणनेच्या घेतलेल्या निर्णयामुळे वंचित समाजघटकांना न्याय मिळणार असून हा निर्णय क्रांतिकारी ठरेल, असं भुजबळ यावेळी म्हणाले.

**<u>वंदेभारत-नांदेड</u>**

नांदेड मुंबई वंदे भारत एक्स्प्रेसचं उद्घाटन उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होत आहे. फडणवीस हे हजूर साहिब नांदेड इथून या रेल्वेगाडीला हिरवा झेंडा दाखवतील. नांदेड ते मुंबई दरम्यानचे 610 किलोमीटरचं अंतर ही गाडी साडे नऊ तासांत पूर्ण करेल.

**<u>कारऑनट्रेन-सिंधुदुर्ग</u>**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकण रेल्वेनं 'कार ऑन ट्रेन अर्थात आपल्या गाडीसह येण्याची अनोखी सुविधा गणेशभक्त कोकणवासीयांना उपलब्ध करून दिली आहे. कोकण रेल्वेच्या पहिल्या कार ऑन ट्रेननं शनिवारी कोलाड ते सिंधुदुर्ग प्रवास केला. या सेवेसाठी सिंधुदुर्गात नांदगाव आणि गोव्यात वेर्णे या दोन स्थानकावर ही सुविधा आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून खूप चांगला प्रवास झाल्याचं प्रवाशांनी सांगितल. यातील एक प्रतिनिधिक प्रतिक्रिया...

**सर्वप्रथम कोकण रेल्वेचे मनःपूर्वक आभार. कारण त्यांनी हा उपक्रम सुरू केल्यामुळे जो रस्त्यावरून प्रवासाचा अतिशय बिकट अनुभव घ्यावा लागायचा दरवर्षी आम्हाला तो अवॉइड करता आला. अतिशय स्मूदली हा प्रवास झाला. आणि दिवसाढवळ्या प्रवास झाल्यामुळे निसर्गसौंदर्य जे नटलेला आहे, पावसामुळे इतक्या दऱ्याखोऱ्या हिरवगार गालीचे हे पाहत पाहत आम्ही फॅमिली ने हा प्रवास अतिशय आनंदाने अनुभवला. आणि आता गणपतीला आम्ही अतिशय अगदी ताजेतवाने होऊन उत्सव आम्ही अगदी जल्लोषाने साजरा करणार आहोत यावर्षी.**

**<u>डॉल्बी-बंदी-सोलापूर</u>**

सोलापूर शहरात मिरवणुकींमध्ये वाढत चालेल्या डिजे डॉल्बीच्या वापरावर कायमची बंदी घालावी यासाठी आता जनआंदोलन उभे राहत आहे. डॉल्बी वापरावर बंदी घालून पारंपरिक वाद्यांना परवानगी देण्याचं आश्वासन जिल्हा प्रशासनानं दिलं असलं तरी डॉल्बी बंद होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याची भूमिका ज्येष्ठ नागरिकांनी घेतली आहे.

**<u>ऋषीपंचमी उत्सव-बुलडाणा</u>**

संत श्री गजानन महाराजांच्या 115 व्या पुण्यतिथीचं औचित्य साधून शेगावमध्ये कालपासून ऋषीपंचमी उत्सवाला सुरुवात झाली. ऋषीपंचमी पर्यंत चालणाऱ्या 5 दिवसांच्या उत्सवामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत.

**पर्युषण पर्व**

जैन धर्मियांच्या पवित्र पर्युषण पर्वाला सुरवात झाली आहे. भाद्रपद महिन्यात संवत्सरी या दिवशी आत्म्याच्या शुद्धतेसाठी आत्मचिंतन आणि सर्व सजीव प्राण्यांची क्षमायाचना असं आठ दिवस होणाऱ्या या उत्सवाचं स्वरूप आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी पर्युषण पर्वानिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**व्यसनमुक्ती-सांगली**

सांगली मध्ये व्यसनमुक्ती केंद्र आणि पुनर्वसन केंद्राचं लोकार्पण काल पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आलं. सांगली जिल्हा अंमली पदार्थ मुक्त करण्याच्या दृष्टीनं सुरू करण्यात या आलेल्या या केंद्रात अद्ययावत यंत्रसामुग्री उपलब्ध असून इथे उपचार मोफत केले जाणार आहेत.

**निधन-जळगाव**

जळगाव मधील व्यापारी आणि सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीनारायण बियाणी यांचं काल वृद्धापकाळानं निधन झालं. ते 95 वर्षांचे होते.

कॉम्रेड प्रभा साधू यांचं काल नागपूर इथं निधन झालं. त्या 89 वर्षांच्या होत्या. साधू यांनी महिला हक्क आणि शिक्षण क्षेत्रात अनेक वर्ष कार्य केलं होतं.

**पुजारा**

भारतीय फलंदाज चेतेश्वर पुजारा यानं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्व प्रकारांमधून काल निवृत्ती जाहीर केली. आपल्या कारकीर्दीबद्दल आपण समाधानी असून योग्य वेळी थांबत आहोत, असं पूजारानं निवृत्तीची घोषणा करताना म्हटलं आहे.

**तिरंदाजी**

कॅनडातील विनीपेग इथं झालेल्या युवा जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्रातील मुलींनी अभिमानास्पद कामगिरी केली आहे. या स्पर्धेत प्रितिका प्रदीप हिने दोन रौप्य पदक, तर गाथा खडके आणि शर्वरी शेंडे यांनी कास्य पदक पटकावलं आहे. गाथा आणि शर्वरी यांनी अमेरिकेच्या संघावर अचूक निशाणा साधत एकतर्फी विजय मिळविला आहे. या यशाबद्दल राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांनी खेळाडू आणि प्रशिक्षकांचं अभिनंदन केलं आहे.

**पाऊस-नंदुरबार, सोलापूर**

नंदुरबार जिल्ह्यातल्या सातपुडा पर्वत रांगामधील मोलगी इथं झालेल्या मुसळधार पावसामुळे देवगोई घाटात दरड कोसळली. रस्त्यावर माती पसरल्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे.

सोलापूर जिल्ह्यात सर्व जलप्रकल्प पाण्याने तुडुंब भरले आहेत. उजनी धरण भरले असून भीमा नदीत पाणी सोडण्यात येत असून नदीकाठच्या गावांना सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे.

**हवामान**

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार